महाराष्ट्र शासन
वेतनपथक, उच्च शिक्षण, पुणे विभाग
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे ४११ ००१.
E-mail : payunit@jdhepune.info
दूरध्वनी क्रमांक - ०२०-२६१२७८३३. २६०५१६३२. फॅक्स नंबर- ०२०-२६०५१६३२

क्र.डीसीपीएस/२०२१-२२/(०१/२१)/०७/वेतनपथक पुणे/ दिनांक- ०९/०९/२०२१

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित कला,विज्ञान,वाणिज्य,विधी, शिक्षणशास्त्र, शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालये
पुणे,अहमदनगर,नाशिक जिल्हे.

२. कुलसचिव,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे
डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे

**विषयः- नविन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजने अंतर्गत (DCPS) खाते क्रमांक देणेबाबत...**

आपणास विदीतच आहे की, दि.०१ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर सेवेत आलेल्या शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांना नवीन परिभाषीत निवृत्तीवेतन योजना शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, दि.२५ मार्च, २०११ अन्वये लागू केलेली आहे. या शासन निर्णयामध्ये दिलेल्या सुचना विचारात घेऊन नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना **(Define Contribution Pension Scheme)** दि.०१.नोव्हें,२००५ रोजी किंवा त्यानंतर सेवेमध्ये आलेल्या शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजने अंतर्गत **(DCPS)** खाते क्रमांक देण्याची कार्यवाही या कार्यालयाकडून करण्यात येते. या योजने अंतर्गत कर्मचा-यांना खाते क्रमांक देण्याबाबत या कार्यालयाने वेळोवेळी कार्यशाळांचे आयोजन करुन त्यामध्ये संबंधीत कर्मचा-यांना खाते क्रमांक दिलेले आहेत. असे असून देखील ब-याच महाविद्यालयांकडुन/विद्यापीठांकडून त्यांचेकडे नियुक्त झालेल्या शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत खाते क्रमांक दणेयाबाबतचे प्रस्ताव या कार्यालयास सादर केले जात आहेत.

वरील बाब लक्षात घेता आणि कर्मचा-यांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजने अंतर्गत **(DCPS)** खाते क्रमांक देण्याची कार्यवाही जलद गतीने व बिनचूकपणे पार पाडण्यासाठी या कार्यालयाने नौरोसजी वाडिया महाविद्यालय, पुणे येथे दि.१५/०९/२०२१ आणि दि.१६/०९/२०२१ या दोन दिवशी कार्यशाळेचे आयोजन केलेले आहे.

तरी आपल्या महाविद्यालयामध्ये/विद्यापीठांमध्ये ज्या कर्मचा-यांना अजुनही नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत **(DCPS)** खाते क्रमांक देण्यात आलेले नाहीत अशा सर्व शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांचे प्रस्ताव खाली नमूद केलेल्या ठिकाणी, वेळेत व दिनांकास यापूर्वी दिलेल्या सुचना विचारात घेऊन ०४ प्रतीत सादर करावेत. यामध्ये कोणताही कर्मचारी नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत **(DCPS)** खाते क्रमांक देण्यापासून वंचीत राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. सदर प्रस्ताव या कार्यालयाकडे यापूर्वी सादर करुन देखील त्नांना अद्यापपर्यंत नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजने अंतर्गत **(DCPS)** खाते क्रमांक दिलेले नाहीत अशा प्रस्तावांचा देखील समावेश करावा.

तसेच या कार्यालयाने यापूर्वी आपल्या महाविद्यालयातील/विद्यापीठातील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांना जे खाते क्रमांक दिलेले आहेत त्यांची माहिती देखील खालील विवरणपत्रामध्ये Microsoft Exel, Times New Roman या Font मध्ये व Font Size-12 मध्ये Hard व Soft Copy मध्ये आणि Pen Drive मध्ये सादर करावी.

| Sr. No. | Name of College/ University | Name Of Employee | Designation | Date Of Birth | Date of Appoinment | DCPS A/C No. Alloted by JDHE Pune |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | | |
| 2 | | | | | | |
| 3 | | | | | | |

Signature of Principal/
Registrar/F.A.O.

तरी वर नमूद केलेल्या सूचना विचारात घेऊन आपले या बाबतचे प्रस्ताव व यापूर्वी दिलेला खाते क्रमांकाची माहिती घेऊन खालील ठिकाणी, दिनांकास व वेळेत उपस्थीत राहावे.

| ठिकाण – नौरोसजी वाडिया महाविद्यालय, पुणे, खोली क्रमांक ४ | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | जिल्हा | दिनांक | वेळ |
| १ | पुणे शहर | दि.१५.०९.२०२१ | सकाळी १०.३० ते दुपारी १.३० पर्यंत |
| २ | पुणे जिल्हा | दि.१५.०९.२०२१ | दुपारी २.०० ते संध्या. ५.०० पर्यंत |
| ३ | अहमदनगर | दि.१६.०९.२०२१ | सकाळी १०.३० ते दुपारी १.३० पर्यंत |
| ४ | नाशिक | दि.१६.०९.२०२१ | दुपारी २.०० ते संध्या. ५.०० पर्यंत |

**सही/-**
**(डॉ.किरणकुमार बोंदर)**
**सहसंचालक, उच्च शिक्षण**
**पुणे विभाग, पुणे**